## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 09/01/2020 (गुरूवार)
## (सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत रोहणा वलनी रोड येथे दिनांक 06/01/2020 ते दिनांक 08/01/2020 चे 17:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सचिन पुरूशोत्तम नागपूरे, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, रोहणा खापरखेडा यांच्या शेतातमध्ये अज्ञात आरोपीने टिनाच्या घरामधुन 7 गट्टे कापुस कि. 7,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नामदेव धांडे हे करीत आहे.

### दुखापत

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 16 कि. मी अंतरावर मौजा जुनोनी येथे दिनांक 07/01/2020 चे 12:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेराम संभाजी फुलझेले, वय 65 वर्ष, रा. जुनोनी उमरेड हे बकऱ्या चारण्यासाठी जंगलात जात असतांना काही बकऱ्या सुनिल माटे यांचे शेतात गेल्या. त्याचे शेतातील नौकर आरोपी नामे– क्रिष्णा राठोड, रा. जुनोनी उमरेड याने फिर्यादीस "तुझ्या बकऱ्या आमच्या शेतात कश्या आल्या" असे म्हणुन आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केले व फिर्यादीच्या हातातील कुऱ्हाडीचा दांडा हिसकुन दांडयाने फिर्यादीला मारहाण करून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीला डाव्या मांडीवर फ्रॅक्चर झाले. तसेच आरोपीने फिर्यादीस बकऱ्या पुन्हा शेतात आले तर पुन्हा मारीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राऊत हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 7 कि. मी अंतरावर मौजा उबाळी शिवार येथे दिनांक 07/01/2020 चे 16:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल काशीनाथ हेलांडे, वय 27 वर्ष, रा. उबाळी, ता. कळमेश्वर यांच्या शेतात आरोपी नामे– कैलास लोनगाडगे, रा. उबाळी याचे बैल चरत होते. दरम्यान फिर्यादीने आरोपीला हटकले की, ''तु बैल माझ्या शेतात का चारतो'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीसोबत वाद घालुन फिर्यादीस शिवीगाळ करून काडीने मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीस ''तुझ्याने जे बनत ते करून घे'' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक तभाने हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. बोरी – अंतर्गत 1 कि. मी अंतरावर मौजा बुटीबोरी सेंट पॉल शाळेसमोर येथे दिनांक 08/01/2020 चे 14.50 वा. ते 15.00 वा. चे सुमारास पो.स्टे. फिर्यादी नामे– सौ. कल्पना राजेश इंगोले, वय 39 वर्ष, रा. प्रभाग क्र. 3, इंदिरा नगर बोरी याच्या मुलगा नामे– सानिकेत राजेश इंगोले, वय 12 वर्ष याला एक युनिकॉन होंडा मोटरसायकलचा वरील अनोळखी आरोपी चालकाने स्कुलसमोर बाहेर बोलावुन मोबाईलवरून बोलनी करून मोटरसायकलवर बसवुन फिर्यादिचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक थोरात हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर